Review Of Research
Vol. 2, Issue. 6, March. 2013
ISSN:-2249-894X Available online at www. lbp.world

ORIGINAL ARTICLE

# क्रांतिसिंह नाना पाटील यांचे भारतीय कम्युनिस्ट पक्षातील कार्य

**विवेकानंद माने.**
सहा. प्राध्यापक, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू. लाड
महाविद्यालय, कुंडल, ता. पलूस, जि. सांगली.

**प्रस्तावना**

क्रांतिसिंह नाना पाटील हे १९४२ च्या क्रां तिलढ्यातील झुंजार सेनानी म्हणून ओळखले जातात. क्रांतिसिंहांचे एकूण जीवन आणि कार्य विचारात घेतल्यास ब्रिटिश आमदनीत सातारा प्रतिसरकारचे संस्थापक म्हणून त्यांच्या कार्याचे महत्त्व जितके आहे, तितकेच त्यांच्या अगोदरच्या आणि नंतरच्या कार्याचेही आहे. त्यांचे नेतृत्व हे बहुजनांचे तसेच समाजसुधारणेच्या चळवळीतून उभे राहीले होते. महात्मा फुलेंनी निर्माण केलेल्या सत्यशोधक चळवळीतूनच क्रांतिसिंह नाना पाटलांचा उदय झाला. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात म. गांधीचा अहिंसावाद स्विकारुन कॉंग्रेसचा प्रसार केला. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र त्यांचा कॉंग्रेसविषयी भ्रमनिरास झाला. बहुजन समाजाच्या नेतृत्वाने निर्माण केलेल्या शेतकरी – कामगार पक्षात त्यांनी प्रवेश केला. पुढील काळात ते कम्युनिस्ट पक्षात दाखल झाले ते अखेरपर्यंत राहिले. जनतेची उपासमार विरोधी चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सीमा भागाची चळवळ या व इतर चळवळीत त्यांनी भाग घेतला व प्रसंगी कारावासही भोगला.

**क्रांतिसिंह नाना पाटील यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य:**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीला दैदिप्यमान इतिहास आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यात १९४२ चे ‘चलेजाव आंदोलन’ स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वाचे पर्व आहे. क्रिप्स योजना फेटाळली गेल्यानंतर वर्धा येथे कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक झाली आणि ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी गवालिया टॅकवर कॉंग्रेस अधिवेशन भरले. या अधिवेशनात छोडो भारतचा ठराव जवाहरलाल नेहरुंनी मांडला. त्यावेळी म. गांधीनी केलेल्या भाषणात ‘करेंगे या मरेंगे’ चा नारा दिला. लोकांच्यात जागृती निर्माण झाली, परंतु दुसऱ्याच दिवशी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या महत्त्वाच्या सर्व पुढाऱ्यांना अटक झाली. त्याची प्रतिक्रिया संपूर्ण भारतभर उमटली. सातारा जिल्ह्यातील नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी भूमिगत होवून कार्य करण्याचे ठरविले. क्रांतिसिंहांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकार चळवळीचे कार्य ब्रिटनच्या पार्लमेंटने नोंद घ्यावी इतके महत्त्वपूर्ण ठरले होते. क्रांतिसिंह नाना पाटील हे १९४२ च्या क्रांतिलढ्यातील झुंजार सेनानी म्हणून ओळखले जातात. त्यांचे नेतृत्व हे बहुजनांचे तसेच समाजसुधारणेच्या चळवळीतून उभे राहीले होते. १८५७ च्या उठावानंतर महाराष्ट्रात इंग्रजी शिक्षण घेतलेल्या पीढीकडून राजकीय व सामाजिक चळवळी चालविल्या गेल्या. महात्मा फुलेंनी निर्माण केलेल्या सत्यशोधक चळवळीतूनच क्रांतिसिंह नाना पाटलांचा उदय झाला.[१] त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात म. गांधीचा अहिंसावाद स्विकारुन कॉंग्रेसचा प्रसार केला.

**क्रांतिसिंहांचे विविध पक्ष व पक्षांतराबद्दल भूमिका:**

स्वातंत्र्योत्तर काळात क्रांतिसिंहांचा कॉग्रेसविषयी भ्रमनिरास झाला. स्वातंत्र्यानंतर राजकारण हे सत्ताकारण बनले. ज्या कॉग्रेसने स्वांतत्र्यपूर्व काळात शेतकरी कष्टकऱ्यांच्या भल्यांचे ठराव केले ती आता भांडवलदारांची पाठराखण करणारी संस्था बनली होती. क्रांतिसिंह तिचे बदलणारे स्वरुप थोपवू शकत नव्हते. त्यांच्याप्रमाणे केशवराव जेधे, शंकरराव मोरे, माधवराव बागल या बहुजन समाजातील कार्यकर्त्यांचा कॉग्रेसविषयी भ्रमनिरास झाला होता. १९४८ साली त्यांनी शेतकरी—कामगार पक्ष स्थापन केला. क्रांतिसिंहांनी कॉग्रेसचा त्याग करुन या नव्या क्रांतिकारी पक्षात प्रवेश केला. पण या पक्षात तात्त्विक वादावादी, पक्षांतर्गत संघर्ष यातून क्रांतिसिंहांची मानसिक व वैचारिक कुचंबणा होवू लागली. याच अवस्थेतून नवजीवन संघटना, कामगार — किसान पक्ष अशा टप्प्यातून ते शेवटी काम्युनिस्ट पक्षात येवून स्थिरावले. नाशिक जिल्ह्यातील रानवड येथील परिषदेत त्यांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. क्रांतिसिंह नाना पाटील कॉम्रेड झाले.[२] गोरगरीब जनतेला न्याय मिळावा यासाठी त्यांचा अट्टाहास असल्याने त्यांना पक्ष बदलावा लागला. क्रांतिसिंह नाना पाटलांच्यावर वारंवार पक्ष बदलल्याबद्दल मोठी टिका झाली होती. त्या टिकेला स्वत: क्रांतिसिंहांनीच समर्पक भाषेत उत्तर दिले आहे. ते म्हणतात, 'कोल्हापूरहून मुंबईला जाण्यासाठी प्रवासात गाड्या बदलाव्या लागतात त्या बदलल्या नाही तर तुम्ही मुंबईला पोहचू शकणार नाही. शेवटच्या मुक्कामाला पोहचण्यासाठीच मीही गाड्या बदलल्या.'[३]

क्रांतिसिंहांच्या पक्षांतराबद्दल श्रीमती कमल भागवतांनी अतिशय वास्तववादी मत व्यक्त केले आहे. त्या म्हणतात, ''१९४७ ते १९५२ ही पाच वर्षे प्रदीर्घ विचारमंथन व मार्गशोधन करुन अण्णा (नाना पाटील) कम्युनिस्ट पक्षात दाखल झाले. ज्ञानदेव—तुकारामाची परंपरा घेवून, ज्योतिबा फुल्यांची अन्यायाची चीड व समाजसुधारणा घेवून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलितावरील अन्यायाची चीड घेवून, लो. टिळक व म. गांधी यांचा साम्राज्यशाहीस विरोध घेवून व श्रमिकांच्या मुक्ती—लढ्याची स्वत:ची जीवननिष्ठा घेवून अण्णा कम्युनिस्ट पक्षात आले. मार्क्सवाद—लेनिनवादाच्या जागतिक दिंडीत सामील झाले.''[४]

**क्रांतिसिंह नाना पाटलांचे कम्युनिस्ट पक्षातील कार्य:**

मार्क्सने सांगितलेल्या साम्यवादाचा प्रभाव नाना पाटलांच्यावरती निश्चितपणाने होता, पण त्या मार्क्सवादाला भारतीय रुप त्यांनी प्राप्त करुन दिले. सांगलीतील एका सभेत मार्क्सवाद समजून सांगताना ते म्हणाले होते 'एका भांडवलदार धनिक श्रीमंत माणसाने सकाळी शिरा, भजी, म्हैसूरपाक, गुलाबजामून वगैरे भरपूर खाऊन दुपारी श्रीखंड—पुरीचे जेवण केले. त्यानंतर चांगली तीन तास ताणून दिल्यानंतर संध्याकाळी ४ वाजता कॉफी, लस्सी व दुध कोल्ड्रींक्स घेतले. टुरिंग कारमधून फिरुन आल्यानंतर रात्रीच्यावेळी मटणबिर्याणीवर ताव मारला. अजीर्ण होवून त्याला रात्रभर झोप येईनाशी झाली. त्याच्या शेजारीच राहणारा हमालही आपल्या हमालीतून मिळणाऱ्या पैशावर स्वत:चे व बायकामुलांचे पोट न भरल्यामुळे रात्रभर झोपत नव्हता. आपल्याला या दोन्हीतील फरक नष्ट करण्यासाठी मार्क्सवादाची आवश्यकता आहे.'[५]

**अखिल भारतीय किसान सभेतील कार्य:**

कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केल्यावर लगेच नानांची पक्षाच्या प्रांतिक कार्यकारणीवर निवड झाली. यावेळी महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. महाराष्ट्रातील अनेक दुष्काळग्रस्त खेड्यांना नानांनी भेटी देवून तेथील जनतेला दिलासा दिला. १९५५ साली कम्युनिस्ट पक्षाच्या अखिल भारतीय किसान सभेच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली.[६] किसान सभेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सर्व देशभर दौरे केले. महाराष्ट्राप्रमाणेच इतर राज्यातील शेतकऱ्यांचे दैन्य व दारिद्र्य जवळून पाहण्याची व अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांची भाषणे मराठीत होत. त्या भाषणांचा अनुवाद कॉम्रेड श्रीनिवास सरदेसाई

लोकांना सांगत असत.[७] या अनुवादीत भाषणालाही लोकांच्या टाळया व हशा मिळत असे. आपल्या देशव्यापी दौऱ्यात त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे बारकाईने निराक्षण करुन त्याच्या नोंदीही ठेवल्या होत्या. त्याआधारे शेतकरी व शेतमजूरांच्या हितासाठी करावयाच्या प्रयत्नांचा आराखडाच त्यांनी किसान सभेपुढे मांडला होता. १० ते १२ जानेवारी १९६८ रोजी त्यांनी अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अधिवेशन अमरावती येथे भरवले होते. या अधिवेशनासाठी देशातील सर्व प्रांतातून शेतकऱ्यांचे प्रतिनिधी बहुसंख्येने उपस्थित होते.

**सोव्हिएट रशियाचा दौराः**

स्वातंत्र्यानंतर भारत—सो. रशिया सांस्कृतिक, साहित्यिक, संस्कृती, कला व विज्ञान यांचे आदान—प्रदान होऊन मैत्रीचे नवीन पर्व सुरू झाले होते. १९५५ च्या प्रारंभी एक रशियन प्रतिनिधी मंडळ भारतात येऊन गेले होते. या मंडळाच्या भेटीनंतर भारत सरकारच्या वतीने भारतीय शेतकऱ्यांचे प्रतिनिधी मंडळ सो. रशियाला भेट देण्यासाठी पाठविण्याचे निश्चित केले गेले. या प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष या नात्याने क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याकडे सोपविण्यात आले.[८]

दिनांक ८ ऑगस्ट १९५५ रोजी नानांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ रशियाला रवाना झाले. या रशिया दौऱ्यात त्यांनी मास्को येथील ५५० एकरामध्ये भरलेले शेती प्रदर्शन पाहिले. एवढे भव्य प्रदर्शन पाहण्यासाठी त्यांना दोन दिवस लागले. रशियातील ट्रॅक्टर, भूमिगत रेल्वे, स्टेडियम, विद्यापीठ वगैरे अद्यावत सुधारणा पाहून नाना प्रभावित झाले. या शिष्टमंडळाने मास्को विद्यापीठाचा परिसर पाहिला व तेथील रशियन विद्यार्थ्यांशी चर्चा केली.[९] त्यानंतर शिष्टमंडळाने रशियातील सहकारी शेती, शेतकरी व शेतमजूर यांची घरे पाहिली. रशियाने यांत्रिक शेतीच्या सहाय्याने केलेल्या प्रगतीचा त्यांना फार अचंबा वाटला. दौऱ्यात नानांनी साम्यवादी देशातील श्रमिकांचे राज्य जवळून पाहिले. कष्टकऱ्यांना त्या देशात असलेले उच्च स्थान पाहून ते प्रभावित झाले. श्रमिकांचे राज्य प्रत्यक्षात पाहिल्यामुळे भारतातही तसे राज्य आणण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या नानांचा उत्साह द्विगुणित झाला. दौऱ्यावरुन परतल्यावर आपल्या दौऱ्यातील काही अनुभव व सुखी शेतकऱ्यांच्या गोष्टी ते खास ढंगात सांगत असत.

**संयुक्त महाराष्ट्र, सीमा लढा व इतर चळवळीतील सहभागः**

शेतकरी कामगार पक्षाने आपल्या स्थापनेपासूनच संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न उचलून धरला होता. या प्रश्नावर मोठे आंदोलन करण्याचा व त्यासाठी इतर पक्षांचा पाठिंबा मिळविण्याचा निर्णय घेतला होता. कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणानुसार नाना पाटलांनी संयुक्त महाराष्ट्रातील जनमत संघटित करण्याच्या कार्यात पुढाकार घेतला. शेकापमधून बाहेर पडल्यावरही नाना पाटलांनी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रचार कार्यात रस घेणे चालूच ठेवले. १० डिसेंबर १९५५ रोजी राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल प्रसिध्द झाला. या अहवालात द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यामुळे या अहवालाविरूद्ध महाराष्ट्रात सर्वत्र असंतोष निर्माण झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या या आंदोलनात क्रांतिसिंहानी मुंबईच्या कामगार विभागात ठिकठिकाणी जाहीर सभा भरवून कामगारांना या आंदोलनात सहभागी होण्याची प्रेरणा दिली.[१०]

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न धसास लावण्यासाठी ६ फेब्रुवारी १९५६ रोजी महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना केली. १९५७ ची होणारी सार्वत्रिक निवडणूक समितीच्या वतीने लढविण्याचा निर्णय सर्वांनी घेतला. या निवडणुकीत सं.म.समितीच्या प्रचारासाठी नाना पाटलांनी संपूर्ण महाराष्ट्रभर प्रवास केला. विशेषत: ग्रामीण भागात संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जागृती करण्याचे काम नाना पाटील यांनीच केले. सं.म.समितीच्या वतीने जे जे

कार्यक्रम हाती घेण्यात आले. त्या प्रत्येक कार्यक्रमात नाना पाटील आघाडीवर राहिले. तसेच खासदार या नात्याने लोकसभेच्या व्यासपीठावर संयुक्त महाराष्ट्राचा आवाज मराठी भाषेतून उठविण्याचे काम त्यांनी केले.[११]

महाराष्ट्र—कर्नाटक सीमा प्रश्नावर त्यांनी सातत्याने आवाज उठविला १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. पण बेळगाव, कारवार, निपाणी, भालकी आदी भाग महाराष्ट्रापासून तोडला गेल्याने तो लढा चालूच राहिला. या लढ्यामध्ये क्रांतिसिंहानी कर्नाटकातील हिंडलगा व शिमोगा येथे ६ महिने तुरुंगवास भोगला.[१२]

याबरोबरच शेती मालाच्या बाजारभावाच्या हमी किंमतीची मागणी, शेतकरी लढे, गोवा मुक्ती आंदोलन, गिरणी कामगारांचे सार्वत्रिक संप, १९६५ चे महागाई विरोधी कृती समितीचे आंदोलन, दलितांची चळवळ, कर्मवीर दादासाहेब गायकवाड व बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या सहकार्याने केलेले दलित जागृतीचे कार्य, दुष्काळ विरोधी परिषदा, भूमिहीन शेतमजुरांचे संघटन इ. घटनांमध्ये क्रांतिसिंहांचा सिंहाचा वाटा आहे.

**चीनचे भारतावरील आक्रमण व नानांची भूमिका:**

भारत व चीन या दोन देशादरम्यान असलेली ब्रिटिशकालीन मॅकमोहन सीमारेषा नाकारून चीनने १९५९ पासून लडाख विभागातील भारतीय भूभाग व्यापण्यास सुरुवात केली होती. पंडित नेहरूंच्या शांततावादी धोरणाला झुगारून चीनने ऑक्टोबर १९६२ मध्ये भारतावर अचानक आक्रमण केले. चीनचे आक्रमण ही आंतरराष्ट्रीय कम्युनिस्टांची एक चाल आहे आणि भारतीय कम्युनिस्टही चीनवादीच आहेत अशी चर्चा देशभर होऊ लागली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही त्यामुळे भारतात कम्युनिस्टांबद्दल अनेक शंका निर्माण होऊ लागल्या होत्या.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या या चुकीच्या धोरणामुळे महाराष्ट्रातही कम्युनिस्टांच्या लोकप्रियतेत घट झाली होती. क्रांतिसिंह नाना पाटील हे महाराष्ट्रातील एक प्रमुख कम्युनिस्ट नेते होते परंतु त्याचबरोबर ते एक स्वातंत्र्यवीर व सच्चे देशभक्त होते. ते जरी विचाराने कम्युनिस्ट झालेले असले तरी त्यांच्या सर्वोच्च निष्ठा या देशाप्रतीच राहिलेल्या होत्या. त्यामुळे देशावरील या आक्रमणाबाबत पक्षाने घेतलेली भूमिका व पक्षनिष्ठा यांना बाजूला ठेवून कोणत्याही परिणामाची तमा न बाळगता नानांनी सर्वप्रथम या चीनच्या आक्रमणाचा जाहीर निषेध केला. त्यांनी आपली सर्व ताकद पणाला लावून भाकपला आपल्या धोरणात बदल करण्यास भाग पाडण्याचे प्रयत्न सुरू केले. याकामी त्यांना कॉ. कमल भागवत, कॉ. ए. बी. वर्धन, कॉ. डांगे, कॉ. बाबूराव जगताप, कॉ. माधवराव गायकवाड यांनी सहकार्य केले.[१३]

मुंबई येथे या चिनी आक्रमणबाबत कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश कौन्सिलची बैठक झाली. या बैठकीत नानांनी चीनच्या आक्रमणाचा कडक शब्दात निषेध केला तसेच भारताच्या चीन विषयीच्या भूमिकेचे समर्थन करून पंडितजींच्या शांततेच्या परराष्ट्रनीती चेही कौतुक केले. संपूर्ण देशवासीयांनी एकत्रितपणे या आक्रमणाचा प्रतिकार करावा असे आवाहनही केले. तसेच प्रांतिक कौन्सिल तर्फे आक्रमणाचा धिक्कार करणारा ठराव पास करून घेतला.[१४] अशाप्रकारे चिनी आक्रमण याविषयी जाहीर भूमिका घेऊन कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र प्रांतिक कौन्सिलतर्फे या चीनच्या आक्रमणाचा निषेध करणारा ठराव पास करून घेऊन भाकपला राष्ट्रीय प्रवाहात आणण्यात पुढाकार नाना पाटलांनी घेतल्याचे दिसून येते.

**इतर कार्ये:**

१९६४ साली नाना भाकपच्या राष्ट्रीय कार्यकारणीवर निवडून गेले. १९६७ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत भाकपने त्यांना मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातून उमेदवारी दिली. तेथील

कष्टकरी जनतेने त्यांच्या उमेदवारीचे मनापासून स्वागत केले. जनतेच्या पाठिंब्याच्या जोरावर ते दुसऱ्यांदा लोकसभेत निवडून गेले. १२ जुलै १९६७ रोजी त्यांनी आपल्या मायबोली मराठीत लोकसभेत भाषण केले. भाकपने शेतमजूरांच्या प्रश्नावर आवाज उठविण्यासाठी १९६८ मध्ये 'अखिल भारतीय शेतमजूर संघटना' स्थापन केली. तिचे अध्यक्षपद क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याकडे दिले.

१९७२ साली भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सव निमित्ताने नानांचा भारत सरकारने ताम्रपट व मानधन देवून सत्कार केला. यानंतर त्यांनी सक्रीय राजकारणातून संन्यास घेतला. मधुमेहाचा आजार बळावर गेला व ६ डिसेंबर १९७६ रोजी त्यांचा मृत्यु झाला.

**निष्कर्ष :**

क्रांतिसिंहांनी मार्क्सने सांगितलेला मार्क्सवाद भारतात रुजवला. त्यांचे ध्येय शेतकरी, गोरगरीब, कामगार व दलित यांच्या उद्धाराचे होते. कॉंग्रेस पक्षात राहून असे कार्य करणे शक्य दिसेना म्हणून त्यांनी पक्षबदल केला. सामान्य माणसाचे कल्याण साधण्यासाठी त्यांनी अनेक वेळा पक्ष बदलले. पण आपली वैचारिक भूमिका सोडली नाही. कम्युनिस्ट पक्षाच्या व्यासपीठावरुन अखेरपर्यंत ते कामगार, कष्टऱ्यांच्या चळवळीत अग्रेसर राहिले. शेतकरी, कामगार व कष्टकरी यांच्या हिताशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. जनतेची उपासमार विरोधी चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सीमा भागाची चळवळ यात त्यांनी भाग घेतला. नाना पाटलांच्या नेतृत्वाखालील भारतीय शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाच्या सो. रशियाच्या दौऱ्याने रशिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया आदी साम्यवादी देशांशी भारतीय संबंध दृढ होण्यास मदत झाली. ते दोनदा लोकसभेचे खासदार झाले. लोकसभेत मराठी भाषेत भाषण करणारे पहिले खासदार ठरले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेवून विदर्भ भागाचा दौरा करुन त्यांचा पाठींबा चळवळीस मिळवला. चीनी आक्रमणाचे भारतातील सर्व कम्युनिस्ट समर्थन करत असताना नाना पाटलांनी चीनी आक्रमणाला विरोध केला यातून त्यांचा भारतीय साम्यवादच दिसतो. सरकारच्या चुकीच्या नीतीमुळे निर्माण झालेली महागाई व त्यामुळे वाढत जाणारी उपासमारी याविरोधात लढ्यासाठी जनतेला कार्यप्रवण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली व प्रसंगी कारावासही भोगला.

**संदर्भ :**

१) नलावडे उज्ज्वला, सत्यशोधकाची संक्षिप्त गाथा, विचारे फार्मस प्रा. लि. प्रकाशन संस्था ठाणे, १९९८, पृ. ३४
२) भागवत कमल, क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील, भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन, २६ जानेवारी १९७७, पृ. २२
३) पवार जयसिंगराव (संपा.), क्रांतिसिंह नाना पाटील, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, २००३, पृ. ९९
४) भागवत कमल, क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील, उपरोक्त पृ. ४२
५) शिवणीकर राघव, सातारचा सिंह क्रांतिसिंह नाना पाटील, समग्र चरित्र, एस. एम. अधाटे प्रकाशन, पुणे ३ ऑगस्ट २०००, पृ. २१६
६) भागवत कमल, क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील, उपरोक्त पृ. २४
७) सरदेसाई श्रीनिवास यांचा लेख, पवार जयसिंगराव (संपा.), उपरोक्त पृ. १५८
८) क्रांतिसिंह नाना पाटील यांनी मास्कोवरून आपल्या घरच्यांना पाठविले दिनांक ७/०९/१९५५ चे पत्र
९) कित्ता
१०) सा. युगांतर, दि. ७/१०/ १९५६ पृ.२

११) पाटील विलास, क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिसिंह विश्वस्त मंडळ, हणमंतवडिये, सांगली, १९८६, पृ. १६४
१२) पाटील रा. तु., क्रांतिसिंह नाना पाटील : एक स्वयंभू ग्रामीण क्रांतिकारक, परखड प्रकाशन, सांगली, १९८९, पृ. ८३
१३) मुलाखतः श्रीमती हौसाताई पाटील, दि. १७/१२/२०१२
१४) कित्ता